# ग्रामीण कृषी मौसम सेवा

भारत मौसम विभाग

प्रायोगिक ब्लॉक लेव्हल ॲग्रोमेट ॲडव्हायझरी बुलेटिन

(आयएमडी आणि आयसीएआर चा संयुक्त उपक्रम)

## हवामानावर आधारीत कृषि सल्ला

**दिनांक : 18-08-2023**

**नागपूर(महाराष्ट्र) मध्ये रामटेक ब्लॉक करा साठी हवामान पूर्वानुमान - वर जारी :2023-08-18 ( पुढील पाच दिवसांसाठी सकाळी ८:३० वाजेपर्यंत वैध)**

| हवामान घटक | 2023-08-19 | 2023-08-20 | 2023-08-21 | 2023-08-22 | 2023-08-23 |
|---|---|---|---|---|---|
| पर्जन्यमान (मिमी) | 138.2 | 40.4 | 29.1 | 23.0 | 18.6 |
| कमाल तापमान (अं.से) | 29.3 | 28.8 | 29.4 | 29.7 | 29.9 |
| किमान तापमान (अं.से) | 21.6 | 22.0 | 21.7 | 22.2 | 22.5 |
| सकाळची सापेक्ष आर्द्रता (टक्के) | 91 | 87 | 85 | 81 | 80 |
| दुपारची सापेक्ष आर्द्रता (टक्के) | 78 | 75 | 74 | 71 | 70 |
| वाऱ्याचा वेग(किमी/तास) | 15 | 13 | 11 | 12 | 10 |
| वाऱ्याची दिशा(अंश) | 302 | 264 | 242 | 254 | 274 |
| मेघाच्छादन (ऑक्टा) | 7 | 8 | 7 | 7 | 7 |

### हवामान सारांश / चेतावणी:

• भारतीय हवामान विभाग, प्रादेशिक हवामान केंद्र, नागपूर च्या तालुकास्तरीय अंदाजानुसार, पुढील पाच दिवस दिनांक१९ ते २३, ऑगस्ट, २०२३ दरम्यान आकाशआंशिक ते मुख्यतः ढगाळ राहण्याची शक्यता, • दिनांक १९, २०, २१, २२ व २३ ऑगस्ट, २०२३ रोजी तालुक्यात हलक्या ते मध्यमस्वरूपाचा पाऊस होण्याची शक्यतावर्तविण्यात आली आहे. • दिनांक १९ व २० ऑगस्ट २०२३ रोजी मेघगर्जनेसह विजांचा कडकडाट होण्याची शक्यता. • दिनांक १९ ऑगस्ट २०२३ रोजी अति जोरदार स्वरूपाचा पाऊस होण्याची शक्यता वर्तविण्यात आली आहे. • विस्तारित स्वरूपाच्या अंदाज प्रणालीनुसार विदर्भामध्ये दिनांक २३ ते २९ ऑगस्ट २०२३ या आठवड्यामध्ये पाऊस हा सरासरी एवढा राहण्याची शक्यता तर कमाल व किमान तापमान सरासरी एवढे राहील.

### कृषि सल्ला:

• जिल्ह्यामध्ये सार्वत्रिक स्वरूपाच्या हलक्या ते मध्यम पावसाची शक्यता लक्षात घेता,आंतरमशागतीची कामे (खुरपणी/डवरणी), कृषी रसायनांच्या (कीटकनाशके, बुरशीनाशके इत्यादी) फवारणी ची कामेआणि उभ्या पिकांमध्ये खते देण्याची कामे पुढील ३-४पुढे ढकलावी तसेच पिकास ओलीत करणे टाळावे. • पावसाचे पाणी दीर्घ काळ शेतात साचून राहणार नाही यासाठी अतिरिक्त पाण्याचा निचरा करावा. • शेतकरी बांधवांनी कीड आणि रोगाचा प्रादुर्भाव जाणण्यासाठी पिकाचे नियमित निरीक्षण करावे तसेच शिफारशीनुसार पिक वाढीच्या सुरुवातीच्या अवस्थेमध्ये नियंत्रणाच्या उपाययोजनाचा अवलंब करावा. • विजांचा कडकडाट होण्याची शक्यता लक्षात घेता गाय, म्हैस, शेळ्या, मेंढ्याव इतर पाळीव जनावरे मोकळ्या जागेत चरावयास सोडण्याचे टाळावे. • जनावरे हे खुल्या पाण्याचे स्त्रोत, नदी किंवा तलाव व ट्रक्टर व इतर धातूच्या अवजारांपासून दूर ठेवावे. स्थानिक हवामान अंदाज व सूचना यांचा अंदाज घेऊनच शेती कामाचे नियोजन करावे. पाऊस व मेघगर्जनेसह विजांचा कडकडाट होण्याची शक्यता लक्षात घेता, शेतकरी व शेतमजूर यांनी सुरक्षित ठिकाणी आसरा घ्यावा. • शेतातील अति महत्वाची कामे शक्यतो सकाळच्या वेळी उरकून घेण्याला प्राधान्य द्यावे. शेतमजुरांना शेतामध्ये एकत्रित समूहाने काम करू न देता दोन व्यक्तीमध्ये जास्तीत जास्त अंतर ठेवावे. • शेतात आसरा घेताना पाण्याचे स्त्रोत (विहीर, तलाव, नदी इत्यादी), उंच ठिकाणे (झाडे, उंचवटे), धातूचे अवजारे या पासून जास्तीत जास्त अंतरावर आसरा घ्यावा. शेतकरी व शेतमजूर यांनी झाडाखाली आसरा घेणे टाळावे तसेच जनावरांचा झाडाखाली आश्रय टाळावा. • जोरदार स्वरूपाच्या पावसाची शक्यता लक्षात घेता, आपली जनावरे (गायी, म्हशी, शेळ्या इत्यादी) वाहत्या पाण्यातून जाणार नाही याची काळजी घ्यावी.

### संक्षिप्त संदेश सल्ला:

• आंतरमशागतीची कामे (खुरपणी/डवरणी), कृषी रसायनांच्या (कीटकनाशके, बुरशीनाशके इत्यादी) फवारणी ची कामेआणि उभ्या पिकांमध्ये खते देण्याची कामे पुढील ३-४ पुढे ढकलावी तसेच पिकास ओलीत करणे टाळावे.

### पिक निहाय सल्ला:

| पिक | पिक निहाय सल्ला |
|---|---|
| कपाशी | • पावसाची शक्यता लक्षात घेता, आंतरमशागतीची कामे (खुरपणी/डवरणी), कृषी रसायनांच्या (कीटकनाशके, बुरशीनाशके इत्यादी) फवारणी ची कामेआणि उभ्या पिकांमध्ये खते देण्याची कामे पुढील ३-४ पुढे ढकलावी तसेच पिकास ओलीत करणे टाळावे. • काही भागांमध्ये, शेतात जिवाणूजन्य करपा/ पानांवरील कोणीय ठिपके रोग आढळून आले आहेत. जिवाणूजन्य करपा रोगाच्या व्यवस्थापनासाठी कॉपर ऑक्सीक्लोराईड ५०% डब्लु.पी. /डब्लु.जी. @२५-३० ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. • पानांवरील बुरशीजन्य ठिपके रोग व्यवस्थापनासाठी बुरशीनाशक – कार्बेन्डाझिम ५० डब्लू. पी. ४ ग्रॅम किंवा प्रोपीकॉनाझोल २५% ई.सी. १० मिली किंवा कार्बेन्डाझिम १२%+मंकोझेब ६३% डब्ल्यू. पी. ३० ग्रॅम किंवा मेटीराम ५५%+पायराक्लोस्ट्रॉबीन ५% डब्लू.जी. २० ग्रॅम किंवा अझोझायस्ट्रॉबीन १८.२% डब्लू/डब्लू+डायफेनोकोनाझोल ११.४% डब्लू/डब्लू एस.सी. १० मिली किंवा फ्लूकझापायरोकझाड १६७ ग्रॅम/ली+पायाक्लोस्त्रोबीन ३३३ ग्रॅम/ली एस.सी. ६ ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. तसेच रोगग्रस्त पिकांचे अवशेष गोळा करून शेताबाहेर नष्ट करावीत. |
| कपाशी | • गुलाबी बोंड अळीच्या निरीक्षणासाठी पेरणीनंतर ४५ दिवसांनी कामगंध सापळ्याचा वापर करावा. पतंगांच्या निरीक्षणासाठी प्रती हेक्टर ५ कामगंध सापळे उभारावे. • फुलांमध्ये गुलाबी बोंड अळीच्या प्रादुर्भाव निरीक्षणासाठी पाते आणि फुले लागण्याच्या अवस्थेत निरीक्षण करावे. प्रादुर्भाव ग्रस्त डोमकळ्या काढून शेताबाहेर नष्ट कराव्या. • कपाशीचे पिक ६० दिवसांपेक्षा कमी असलेल्या ठिकाणी, ५ % निंबोळी अर्क + ५ मिली निम तेल प्रती लिटर पाणी,किंवा कडुनिंब तेलावर आधारित फॉर्म्युलेशन ५ मिली प्रती लिटर (३००किंवा १५०० पीपीएम) + 1.0 ग्राम धुण्याचा सोडा (प्रारंभिक १ ते २ फवारण्या) फवारणी करावी. निंबोळी अर्क २५ लिटर + निम तेल २.५ लिटर + ०.५ किली धुण्याचा सोडा यांचे मिश्रण प्रती हेक्टर या प्रमाणात वापरावे. फवारणी साठी प्रती एकर १५० ते २०० लिटर पाणी किंवा ३७५ ते ५०० लिटर पाणी प्रती हेक्टर या प्रमाणात वापरावे. |
| कपाशी | • ज्या ठिकाणी कपाशीचे पिक ६० ते ९० दिवसांचे आहे अशा ठिकाणी तुडतुडे किडीचा प्रादुर्भाव दिसून आल्यास आणि आर्थिक नुकसान पातळी गाठत असल्यास,फ्लॉनिकॅमिड ५० डब्ल्यूजी @ ४ ग्राम प्रती १० लिटर पाणी (२०० ग्राम प्रती हेक्टर)किंवा डिनोटेफुरान २० एसजी ३ ग्राम प्रती १० लिटर पाणी (१५० ग्राम प्रती हेक्टर) किंवा इमिडाक्लोप्रिड १७.८ एसएल ३ मिली प्रती १० लिटर पाणी (१५० मिली प्रती हेक्टर) या पैकी कोणत्याही एका किटकनाशकाची फवारणी सध्याच्या पावसाच्या उघाडीनंतर स्वच्छ व शांत हवामान असताना करावी. |
| कपाशी | • मागील आठवड्यातील पावसाचा खंड व उष्ण हवामानामुळे कपाशी पिकामध्ये फुलकिडे किडीचा प्रादुर्भाव आढळून आल्यास आणि आर्थिक नुकसान पातळी गाठत असल्यास थायमीथोक्झाम २५ % डब्ल्यूजी २ ग्राम प्रती १० लिटर पाणी (१००ग्राम प्रती हेक्टर) किंवा स्पिनेटोरम ११.७ एससी ८.४ मिली प्रती १० लिटर पाणी (४२० मिली प्रती हेक्टर) या प्रमाणात सध्याच्या पावसाच्या उघाडीनंतरस्वच्छ व शांत हवामान असताना फवारणी करावी. |
| कपाशी | • ज्या ठिकाणी कपाशीचे पिक ६० ते ९० दिवसांचे आहे अशा ठिकाणी, पांढरी माशी किडीच्या व्यवस्थापनासाठी ऑगस्ट महिन्यामध्ये प्रती हेक्टर १०० पिवळे चिकट सापळे लावावे. |
| सोयाबीन | • पावसाची शक्यता लक्षात घेता, आंतरमशागतीची कामे (खुरपणी/डवरणी), कृषी रसायनांच्या (कीटकनाशके, बुरशीनाशके इत्यादी) फवारणी ची कामेआणि उभ्या पिकांमध्ये खते देण्याची कामे पुढील ३-४ पुढे ढकलावी तसेच पिकास ओलीत करणे टाळावे. • सोयाबीन पिकाचे नियमित अंतराने निरीक्षण करावे वअँथ्रॅकनोजप्रादुर्भाव दिसून आल्यास टेबूकोनाझोल २५.९ ईसी (६२५ मिली/हेक्टर) किंवा टेबूकोनाझोल १० % + सल्फर ६५ % डब्ल्यूजी (१२५० ग्राम/हेक्टर) या प्रमाणात शांत व स्वच्छ हवामान परिस्थिती असताना फवारणी करावी. • शेतकरी बांधवांनी सोयाबीन पिकामध्ये नियमित अंतराने शेताच्या ३ ते ४ ठिकाणी कीड/अळी चा प्रादुर्भाव तसेच त्यांच्या अवस्था या बाबतीत निरीक्षण करावे. यामुळे कीड नियंत्रणाचे उपाय राबविण्यासाठी मदत होईल. • शेतकरी बांधवांनी अळ्या खाणाऱ्या शिकारी पक्ष्यांना थांबण्यासाठी सोयाबीन शेतात विविध ठिकाणी ‘ T ’ आकाराचे पक्षीथांबे उभारावेत. • सेंद्रिय सोयाबीन उत्पादन करणाऱ्या शेतकरी बांधवांनी पाने खाणाऱ्या किडीच्या (उंटअळी, तंबाखूची पाने खाणारी अळी) नियंत्रणासाठी बॅसिलस थुरिंजेनेसिस किंवा ब्यूव्हेरिया बेसियाना १ लिटर प्रती हेक्टर या प्रमाणात वापर करावा. |
| सोयाबीन | • सोयाबीन पिकामध्ये पिवळा मोझेक विषाणू या रोगाचा प्रसार करण्यास कारणीभूत असलेल्या पांढऱ्या माशी या किडीच्या प्रतिबंधात्मक व्यवस्थापनासाठी शेतामध्ये ठीक ठिकाणी पिवळे चिकट सापळे |

| पिक | पिक निहाय सल्ला |
|---|---|
| | लावावेत. • सोयाबीन पिकामध्ये पिवळ्या मोझेक या रोगाच्या व्यवस्थापनासाठीशेतातील प्रादुर्भाव ग्रस्त झाडे उपटून नष्ट करावी तसेच पूर्व मिश्रितकीटकनाशक, थायमेथोक्झाम १२.६ % + लॅम्बडा सायहॅलोथ्रिन ९.५ %झेडसी १२५ मिली प्रती हेक्टर किंवा बीटा- सायफ्ल्यूथ्रीन ८.४९ % +इमिडाक्लोप्रिड १९.८१ % ओडी ३५० मिली प्रती हेक्टर ५०० लिटर पाणीया प्रमाणात मिसळून स्वच्छ हवामान परिस्थिती असताना फवारणी करावी.या फवारणी द्वारे खोड माशी या किडीचे सुद्धा नियंत्रण होते, पिवळा मोझेकया विषाणू जन्य रोगाच्या प्रसारास कारणीभूत पांढरी माशी या किडीलाआकर्षित करण्यासाठी ठीक ठिकाणी पिवळे चिकट सापळे लावावेत. |
| सोयाबीन | • पावसाची शक्यता लक्षात घेता, आंतरमशागतीची कामे (खुरपणी/डवरणी), कृषी रसायनांच्या (कीटकनाशके, बुरशीनाशके इत्यादी) फवारणी ची कामेआणि उभ्या पिकांमध्ये खते देण्याची कामे पुढील ३-४ पुढे ढकलावी तसेच पिकास ओलीत करणे टाळावे. • सोयाबीन पिकामध्ये खोडमाशी किडीचा प्रादुर्भाव दिसून आल्यास नियंत्रणासाठी थायमेथोक्झाम १२.६ टक्के + लॅम्बडा सायहॅलोथ्रिन ९.५ % झेडसी १२५ मिली प्रती ५०० लिटर पाणी प्रती हेक्टर या प्रमाणात स्थानिक स्वच्छ हवामान परिस्थिती असताना फवारणी करावी. • सोयाबीन पिकामध्ये चक्रीभुंगा व पाने खाणाऱ्या अळ्यांच्या एकत्रित व्यवस्थापनासाठी क्लोरॅंट्रानिलिप्रोल ०९.३० % + लॅम्बडा सायहॅलोथ्रीन ०४.६० % झेडसी (२०० मिली मिली/हेक्टर) किंवा थायमेथोक्झाम १२.६ टक्के + लॅम्बडा सायहॅलोथ्रिन ९.५ % झेडसी १२५ मिली प्रती हेक्टर किंवा बीटा- सायफ्ल्यूथ्रीन ८.४९ % + इमिडाक्लोप्रिड १९.८१ % ओडी ३५० मिली प्रती हेक्टर या प्रमाणात स्वच्छ हवामान परिथिती असताना फवारणी करावी. |
| सोयाबीन | • सोयाबीन पिकामध्ये उंटअळी, तंबाखूची पाने खाणारी अळी व शेंगा पोखरणाऱ्या अळीच्या व्यवस्थापनासाठी ब्रोफ्लानिलाइड ३०० g/l एससी (४२ ते ६२ ग्राम प्रती हेक्टर) किंवा फ्लुबेन्डियामाइड ३९.३५ % w/w एससी (१५० मिली प्रती हेक्टर) किंवा इंडोक्साकार्ब १५.८० %ईसी (३३३ मिली प्रती हेक्टर)किंवा टेट्रानिलीप्रोल 18.18 एससी (२५० ते ३०० मिली प्रती हेक्टर) किंवा नोव्हॅल्युरॉन ०५.२५ % + इंडॉक्साकार्ब ०४.५० % एससी (८२५ ते ८७५ मिली प्रती हेक्टर)किंवा क्लोरॅंट्रानिलिप्रोल १८.५ % एससी (१५० मिली प्रती हेक्टर) किंवा ईमामेक्टिन बेंझोएट ०१.९० % ईसी (४२५ मिली/हेक्टर) किंवा फ्लुबेन्डियामाइड २० %डब्ल्यूजी (२५० ते ३०० ग्राम प्रती हेक्टर) किंवा लॅम्बडा- सायहॅलोथ्रीन ०४.९० %सीएस (३०० मिली/हेक्टर) किंवा प्रोफेनोफोस ५० %ईसी (१ लिटर प्रती हेक्टर) किंवा स्पिनेटोरम ११.७० % एससी (४५० मिली प्रती हेक्टर) किंवा पूर्व-मिश्रित किटक नाशक बीटा-सायफ्लुथ्रिन ०८.४९ % + इमिडाक्लोप्रिड १९.८१ % w/w ओडी (३५० मिली प्रती हेक्टर) किंवा थायामेथोक्सम १२.६० % + लॅम्बडा-सायहॅलोथ्रीन ०९.५०% झेडसी (१२५ मिली/हेक्टर) किंवा क्लोरॅंट्रानिलिप्रोल ०९.३० % + लॅम्बडा-सायहॅलोथ्रीन ०४.६० % झेडसी (२०० मिली प्रती हेक्टर) या प्रमाणात वरीलपैकी कोणत्याही एक कीटकनाशकाची स्वच्छ हवामान परिस्थिती असताना करावी. |
| भात | • जमिनीची तपासणी करुन योग्य प्रमाणात रासायनिक खताचा वापर केल्यास शेती किफायतशीर होते. सर्वसाधारणपणे १०० किलो नत्र, ५० किलो स्फुरद व ५० किलो पालाश प्रति हेक्टरी द्यावे. संपूर्ण स्फुरद व पालाश आणि नत्राची अर्धी मात्रा चिखलावर तर उरलेली नत्राची अर्धी मात्रा दोन समान हप्त्यात (फुटवे फुटण्याच्या वेळी साधारणपणे ३० दिवसांनी आणि लोंबी येण्याच्या सुरुवातीस साधारणपणे ६० दिवसांनी) विभागून द्यावी. • तण व्यवस्थापनाकरिता आंतरमशागत म्हणुन ज्या धानाची रोवणी १५ x १५ सेमी., २० x २० सेमी., २० x २५ सेमी. अंतरावर केली असेल त्यांनी पॅड्डी पॉवर विडर किंवा कोनो विडरचा वापर करावा. पहिली डवरणीची पाळी रोवणीनंतर पिक चांगले रुजल्यावर २० दिवसांनी दुसरी ४५ दिवसांनी व शक्य झाल्यास तीसरी पाळी ६० दिवसांनी द्यावी. पिकाजवळील राहिलेले व कुजलेले तण मजुरांनी काढुन घ्यावेत. • उगवणपश्चात:- बिसपायरीबॅक सोडियम १०% एस.सी. @ ६ ते ७ मिली रोवणीनंतर १० ते १५ दिवसांनी किंवा ब्युटाक्लोर ५०% ई. डब्ल्यु.@ ५० ते ६० मिली रोवणीनंतर १० ते १५ दिवसांनी किंवा अझिमसल्फुरॉन ५०% डी.एफ. @ २.३ ग्रॅम रोवणीनंतर २० ते २५ दिवसांनी प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. |
| भात | • खोडकिडीच्या व्यवस्थापनासाठी हेक्टरी २० या प्रमाणे कामगंध सापळे लावावे. ट्रायकोग्रामा जापोनिकम (ट्रायकोकार्ड) हे परोपजीवी किटक हेक्टरी ५०,००० अंडी या प्रमाणात दर ७ दिवसाच्या अंतराने ३ ते ४ वेळा सोडावे. शेतात १० % किडग्रस्त फुटवे दिसताच क्लोरॅनट्रानीलीप्रोल ०.४ % दाणेदार @ १० कि.ग्रॅ. किंवा कारटॅप हायड्रोक्लोराईड ४ जी @ १८ कि.ग्रॅ. किंवा फीप्रोनिल ०.३ जी @ २५ कि.ग्रॅ. प्रती हेक्टर बांधीमध्ये पाणी असतांना टाकावे किंवा क्लोरॅनट्रानीलीप्रोल १८.५ % एस.सी. @ ३ मिली. प्रति १० लीटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. • करपा:- हेक्झाकोनॅझोल ५ % ई.सी. @ २० मि.ली. किंवा मेंकोझेब ७५% प्रवाही @ ३० ग्रॅम प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. • कडाकरपा:- कॉपर हैड्रॉकसाईड ५३.८ % टक्के डी एफ @ ३० ग्रॅम + स्ट्रेप्टोसायक्लीन @ १.५ ग्रॅम प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. • लष्करी अळी :- पिकावरून दोर किंवा झाडाच्या फांदया आडव्या फिरवून लष्करी अळ्या पाडाव्यात. तसेच बेडकांचे संवर्धन करावे कारण बेडूक अळ्या खातात. |
| तूर | • पावसाची शक्यता लक्षात घेता, आंतरमशागतीची कामे (खुरपणी/डवरणी), कृषी रसायनांच्या (कीटकनाशके, बुरशीनाशके इत्यादी) फवारणी ची कामेआणि उभ्या पिकांमध्ये खते देण्याची कामे पुढील ३-४ पुढे ढकलावी तसेच पिकास ओलीत करणे टाळावे. |

| पिक | पिक निहाय सल्ला |
|---|---|
| मोसबी | • पावसाची शक्यता लक्षात घेता, आंतरमशागतीची कामे (खुरपणी/डवरणी), कृषी रसायनांच्या (कीटकनाशके, बुरशीनाशके इत्यादी) फवारणी ची कामेआणि उभ्या पिकांमध्ये खते देण्याची कामे पुढील ३-४ पुढे ढकलावी तसेच पिकास ओलीत करणे टाळावे. • वाढ होणाऱ्या आंबिया बहराच्या संत्रा मोसंबी फळझाडांसाठी प्रत्येक झाडाला ५० ग्रॅम फेरस सल्फेट (FeSO4) आणि ५० ग्रॅम झिंक सल्फेट (ZnSO4) व ५ किलो शेणखत किंवा गांडूळ खत यासह शिफारशीत मुख्यअन्नद्रव्य खतांच्या उर्वरित मात्रा झाडांच्या आळ्यात द्याव्यात. • ज्या बगीच्यात ग्रीनींग जीवाणू (वायवार) संक्रमणाची लक्षणे (फळांवर निस्तेज हिरवा पिवळा रंग किंवाहिरव्याकंच फळांवर फळांच्या बटणाच्या ऊतींचे लालसर होणे) दिसून आली आहेत अशा झाडांवरटेट्रासायक्लिन हायड्रोक्लोराईड ६०० पीपीएम (६० ग्रॅम / १०० लिटर पाण्यात) आणि त्यानंतर २१ दिवसांनीस्ट्रेप्टोसायक्लिन किंवा के सायक्लिन १५० पीपीएम (१.५ ग्रॅम / १० लिटर पाणी) या फवारण्या कराव्यात. • फळांवरची फॉयटॉफ्थोराची तपकिरी कूज साठी फॉसेटिल ए. ल २.५ ग्रॅम प्रति लिटर पाण्यात (ऑगस्ट आणिसप्टेंबरमध्ये दोनदा ४० दिवसांच्या अंतराने) पानांवार फवारणी करावी. • मूळकूजहोत असलेल्या बगीच्यात मेफेनॉक्सम एमझेड २.५ ग्रॅम/लिटर ५-१० लिटर (झाडाच्या आकारमानावरअवलंबून) प्रति झाड किंवा फोसेटिल अॅल्युमिनियम २.५ ग्रॅम/लिटर (४० दिवसांच्या अंतराने दोनदा)आळवणी व फवारणी करावी. अतिग्रसित झाडांवरील सर्व फळे काढून टाकावीत आणि नंतर मेफेनॉक्समएमझेड (२.५ ग्रॅम प्रती लिटर पाणी) + कार्बेन्डाझिम (१ ग्रॅम प्रती लिटर पाणी) द्रावणाने फवारणी करावी. • कलेटोट्रीकम आणि बोट्रीयोडिप्लोडिया बुरशी प्रभावित झाडांवर १ ग्रॅम प्रती लिटर पाणी या प्रमाणातकार्बेन्डाझिम किंवा थायोफनेट मिथाइलची दोनदा फवारणी करावी. पहिल्या फवारणीनंतर १० दिवसांनी दुसरीफवारणी पुन्हा करावी. अझोक्सिस्ट्रोबिन+डायफेनकोनाजोल बुरशीनाशक ०.५ मिली प्रती लिटर पाणी फवारणी पर्याय म्हणूनकरता येते. • फळ माशीच्या नियंत्रणासाठी हेक्टरी २०-२५ मिथाइल युजेनॉलचे काम गंध सापळे लावणे. प्रत्येक १५-२०दिवसांच्या अंतराने आमिष (मिथाइल युजेनॉल) बदलावे. • फळांच्या परिपक्वतेच्या अवस्थेत फळांचा रंग बदलाच्या वेळी फळ रस शोषण करणाऱ्या पतंगाच्याव्यवस्थापनासाठी कडूलिंबाचे तेल १० मि. लि./लिटर किंवा पेट्रोलियम फवारणी तेल (खनिज तेल) २० मि.लि./लिटर १०-१५ दिवसांच्या अंतराने, फळांची तोडणी होईपर्यंत करावी. • बगीच्यात झाडाखाली पडलेली फळे एकत्र करून कंपोस्ट खड्ड्यात पुरून टाकावीत. • सप्टेंबर आणि ऑक्टोबर महिन्यात ३५ डिग्री सेल्सिअस कमाल तापमानासह आठवड्यापेक्षा जास्त काळकोरडे हवामान राहिल्यास ४० ग्रॅम प्रती लिटर पाण्यात मिसळून केओलिनची फवारणी करावी. |
| मोसबी | • लिंबू वर्गीय फळ पिकामध्ये कोळी किडीच्या व्यवस्थापनासाठी अबामेक्टीन १.९ ईसी* किंवा प्रोपारगाईत ५७ ईसी* २० मिली किंवा इथिओन ५० ईसी* २० मिली किंवा डायफेन्थीयुरोन ५० डब्ल्यू पी २० ग्राम प्रती १० लिटर पाण्यात मिसळून २० दिवसाच्या अंतराने आलटून पालटून फवारणी करावी. • फ्रुट लेट ब्लाईट रोगाच्या प्रादुर्भावामुळे काळे डाग पडून होणाऱ्या लहान फळांची गळ कमी करण्यासाठी कॉपर ऑक्सिक्लोराईड ५० % डब्ल्यूपी २५ ग्राम प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. |

**फळे आणि भाजीपाला पिक निहाय सल्ला:**

| फळे आणि भाजीपाला पिक | फळे आणि भाजीपाला पिक निहाय सल्ला |
|---|---|
| संत्रा | • झाडांच्या बुंध्याजवळ पाणी साचून राहणार नाही याची काळजी घ्यावी. फायटोप्थोरा ब्राउन रॉट हा एक फळांचा रोग आहे. जोसहसा सतत दमट हवामान आणि पाण्याचा निचरा न होण्याशी संबंधित असतो. पावसाळ्यात किंवा पावसाळ्याच्या उत्तरार्धात जास्त प्रमाणात पाऊस पडल्यानंतर या रोगाचा प्रादुर्भाव सामान्यतः दिसून येतो. या कालावधीमध्ये इतर कारणांमुळे झालेली फळगळ गोंधळात टाकणारी असते. या रोगाची लक्षणे प्रामुख्याने सुरवातीला परिपक्क किंवा परिपक्व होण्याच्या स्थितीत असलेल्या फळांवरती आढळून येते. सुरुवातीला पाणी शोषण केल्यासारखे घट्ट चमड्या सारखे चट्टे दिसून येतात परंतु ते लवकर मऊ होतात आणि पिवळट तपकिरी रंगाचे दिसू लागतात व त्यांना झोंबणारा गंध येतो. उच्चं आद्रतेमुळे फळांच्या पृष्ठभागावरती बुरशीच्या पांढुरक्या मायसेलिया ची वाढ होते आणि संक्रमित फळ अखेरीस खाली पडतात. प्रसंगी फांद्या, पाने आणि मोहोर तपकिरी रंगाचे होऊन मरतात. या रोगाची सर्वात गंभीरबाब म्हणजे फळ तोडणीच्या आधी फळांवरती लक्षणे दिसत नाही. साठवण आणि वाहतुकीच्या दरम्यान संक्रमित फळे निरोगी फळात मिसळल्यास चांगल्या फळांना सुद्धा यारोगाची लागण होऊन रोगाचा प्रसार होतो. • ब्राऊन रॉट चे व्यवस्थापन प्रतिबंधावर अवलंबून असते. ज्यामध्ये जमिनीपासून २४ इंच किंवा त्यापेक्षा जास्त उंचीवरून झाडाची छाटणी केल्याने या रोगाचे प्रमाण कमी करता येते. कॉपर युक्त बुरशीनाशनकाची (१% बोर्डेक्स मिश्रण किंवा कॉपर ऑक्सिक्लोराईड ३.० ग्राम / लिटर) फवारणी केल्यास दमट हंगामात संरक्षण प्रदान करते. पाऊस जास्त पडल्यास ऑगस्ट किंवा सप्टेंबर च्यामहिन्यामध्ये वरील बुरशीनाशनकाची पुन्हा फवारणी करावी. रोगाचा गंभीर धोका असल्यास उत्पादकांना संक्रमित फळबागांमध्ये फॉसेटिल अल्युमिनियम किंवा मेफेनोक्झाम एमझेड @ २.५ ग्रॅम / लिटर पाण्यात फवारणी करावी. फळ तोडणीच्या वेळी |

| फळे आणि भाजीपाला पिक | फळे आणि भाजीपाला पिक निहाय सल्ला |
|---|---|
| | संक्रमित फळे क्रेट / बॉक्स मध्ये टाकल्या जाऊ नये याची खबरदारी घ्यावी तसे केल्यास प्रक्रिया किंवा पॅकेजिंग ची सुविधा नाकारण्यात येऊ शकते. |
| वांगे | • पावसाची शक्यता लक्षात घेता, आंतरमशागतीची कामे (खुरपणी/डवरणी), कृषी रसायनांच्या (कीटकनाशके, बुरशीनाशके इत्यादी) फवारणी ची कामेआणि उभ्या पिकांमध्ये खते देण्याची कामे पुढील ३-४ पुढे ढकलावी तसेच पिकास ओलीत करणे टाळावे. • सद्य स्थितीत ढगाळ हवामानामुळे वांगी पिकावर मावा, तुडतुडे, पांढरी माशी व कोळी किडीच्या प्रादुर्भाव दिसून आल्यास नियंत्रणासाठी रोप लावणीनंतर २ आठवड्यांनी डायमेथोएट ३० टक्के प्रवाही १० मिली किंवा क्विनालफॉस २५ टक्के प्रवाही २० मिली किंवा थायोमेटोन २५ टक्के प्रवाही १० मिली प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. |
| टोमॅटो | • पावसाची शक्यता लक्षात घेता, आंतरमशागतीची कामे (खुरपणी/डवरणी), कृषी रसायनांच्या (कीटकनाशके, बुरशीनाशके इत्यादी) फवारणी ची कामेआणि उभ्या पिकांमध्ये खते देण्याची कामे पुढील ३-४ पुढे ढकलावी तसेच पिकास ओलीत करणे टाळावे. • सद्य स्थितीत ढगाळ हवामानामुळे टोमॅटो पिकामध्ये करपा रोगाचा प्रादुर्भाव दिसून असल्यास नियंत्रणासाठी मॅनकोझेब ७५ डब्लूपी. २५ ग्राम किंवा कॉपर ऑक्सिक्लोराईड ५० डब्लूपी. २५ ग्राम, १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. फुलकिडे आणि पांढऱ्या माशीच्या नियंत्रणासाठी थायमेथोक्झाम २५ टक्के विद्राव्य दाणेदार ४ ग्राम किंवा डायमेथोएट ३० टक्के प्रवाही १० मिली प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. |

## पशुधन विषयक निहाय सल्ला:

| पशुधन विषयक | पशुधन विषयक निहाय सल्ला |
|---|---|
| गाय | • गोठयातील जमीन कोरडी ठेवावी व स्वच्छता राखावी. • बुरशी लागू नये यासाठी जनवारांचे खाद्य व चारा सुरक्षित साठवावा. • जनावरांच्या गोठयाचा सभोवतालील परिसर स्वच्छ व निरोगी ठेवावा आणि गोठ्याभोवती असलेली अनावश्यक झाडे झुडुपे काढून टाकावीत. • नवीन हिरवा चारा जास्त प्रमाणात खाण्यास जनावरांना प्रतिबंध करावा. |
| बकरा किंवा बकरी | • शेळ्यांना पायखुरी/तोंडखुरी, घटसर्प आणि आंत्रविषार टाळण्याकरिता पशुवैद्यकीय अधिकाऱ्याच्या सल्ल्याने लसीकरण करावे. जनावरांना स्वच्छ आणि थंड पाण्याची सोय करावी. |

## कुकुटपालन विषयक निहाय सल्ला:

| कुकुटपालन विषयक | कुकुटपालन विषयक निहाय सल्ला |
|---|---|
| पक्षी | • पक्षांना सकस आहार तसेच स्वच्छ व थंड पाण्याची व्यवस्था करावी. |

## इतर (माती / जमीन तयार करणे) निहाय सल्ला:

| इतर (माती / जमीन तयार करणे) | इतर (माती / जमीन तयार करणे) निहाय सल्ला |
|---|---|
| सामान्य सल्ला | • शेतकरीबांधवांनी मेघगर्जना आणि आकाशात विजा चमकत असतांना घ्यावयाची काळजी: जर तुम्हीशेतात काम करीत असाल तर शेताजवळील ताबडतोब आश्रय घ्यावा. शेतातील सुरक्षितठिकाणाचा आसरा घेतल्यानंतर पायाखाली कोरडे लाकूड, प्लास्टिक, गोणपाट, कोरडापालापाचोळा ठेवावा. तुमचे दोन्ही पाय एकत्र करून गुडघ्यावर दोन्ही हात ठेवूनतळपायावर बसावे. तुमच्या पायाव्यतिरिक्त शरीराचा अन्य कुठलाही भाग जमिनीलास्पर्श होणार नाही याची काळजी घ्यावी. जमिनिमध्ये ओलावा असलेल्या ठिकाणीकिंवा पाण्याच्या स्त्रोतामध्ये जसे कि, तलावात काम करणाऱ्या व्यक्तींनी ताबडतोब सुरक्षित आणि कोरड्या ठिकाणी जावे.जवळपास उंच झाडे असतील तर त्या झाडाच्या उंचीपेक्षा दुप्पट उंचीच्या अंतरावरआश्रय घ्यावा. • विजांच्याबचावापासून पक्के घर हे सर्वात सुरक्षित ठिकाण आहे. शेतकऱ्यांनी आपले घर तसेचजनावरांचा गोठ्याच्या आजूबाजूला शक्यतो कमी उंचीची झाडे लावावीत. ओलावा असलेले, दलदलीचे ठिकाण तथा पाण्याचे स्तोत्र (विहीर, तलाव, नदी, शेत तालाव ई.) पासूनशक्यतो दूर राहावे. चारचाकी वाहनातून प्रवास करीत असल्यास वाहनातच थांबावे.शेतकरी बांधवांनी त्यांच्याजवळ |

| **इतर (माती / जमीन तयार करणे)** | **इतर (माती / जमीन तयार करणे) निहाय सल्ला** |
|---|---|
| | धातूचे कुठलेही उपकरण नसावे याची दक्षता घ्यावी.शेतामध्ये काम करतांना एकाच वेळी जास्त व्यक्तींनी एकत्र काम करू नये. दोनव्यक्तीमध्ये किमान १५-२० फूट अंतर राहील याची काळजी घ्यावी. धातूची दांडीअसलेल्या छत्रीचा वापर करू नका. शेतकऱ्यांनी विजेवर चालणारी तसेच धातू पासूनबनलेल्या इतर कृषी अवजारांपासून दूर रहा. |
| सामान्य सल्ला | • हवामान आधारित कृषी सल्ला पत्रिकेमध्ये नमूद तारखांची वैधता हि नमूद तारखेच्या सकाळी ०८:३० वाजेपर्यंत असेल, याची नोंद घ्यावी. * संशोधनावर आधारित शिफारस. दोन किंवा त्यापेक्षा अधिक रसायने किंवा संजीवके एकत्र मिसळू नये. |